दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● शनिवार २० एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २४७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# सहा.पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांचे पथकाची दंबग कारवाई गोवंश जातीचे जनावरे कत्तलखाण्याकडे जाणा-या वाहनावर छापा

## १६ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त ०७ आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल






**वादळवार्ता/केज**

सहा.पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांचे पथकाची दंबग कारवाई करत गोवंश जातीचे जनावरे कत्तलखाण्याकडे वाहुन नेणाऱ्या वाहनावर छापा मारुण तब्बल १६ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून ०७ आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत वृतात असे कि दिनांक १८.०४.२०२४ रोजी सहा. पोलीस अधिक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग केज यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक आयशर पासींग क्रमांक एम.एच.०४ जी.सी. ८५२३ यामध्ये गोवंश जातीचे जनावरे भरुन ती कत्तलीसाठी बेकायदेशिर रित्या साळेगावकडुन केज कडे अवैद्य वाहतुक करित आहे अशी माहिती मिळाल्यावरुन सहा. पोलीस अधीक्षक, श्री. कमलेश मीना यांनी पथकातील दिलीप गित्ते, पोलीस नाईक विकास चोपने, अनिल मंदे, चालक पोलीस हवालदार माने यांना सदर वाहन ताब्यात घेवुन कायदेशिर कारवाई करणे बाबत आदेश दिल्याने वर नमुद पथकातील पोलीस अंमलदार यांनी चिंचोळीमाळी फाटा येथे थांबवुन रात्री १८.३० वाजण्याचे सुमारास वर नमुद वाहन ताब्यात घेतले, वाहनाचे चालक यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव सत्तार तांबोली रा. कोकचपिर ता. केज जि.बीड असे सांगीतले तसचे गाडीतील लोकांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सलमान अमजद पठाण, रा. टिपु सुलतान चौक, केज ता. केज जि.बीड (क्लीनर), बाबासाहेब पंढरीनाथ दळवी, रा.दळवी वस्ती केज, सदरच्या वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये ०४ गाई, ०८ कालवड, ०८ गोरं, ०२ हल्या, ०२ जर्सी गाईचे वासरं असे एकुण ६,१७,००० रूपयाचे जनावरे मिळुन व १० लाख रुपये किंमतीचे आयशर जप्त करुन असा एकुण १६,१७,००० रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन अमजद सत्तार तांबोली रा. कोकचपिर ता. केज जि.बीड (चालक), सलमान अमजद पठाण, रा. टिपू सुलतान चौक, केज ता.केज जि.बीड (क्लीनर), बाबासाहेब पंढरीनाथ दळवी, रा.दळवी वस्ती केज (व्यापारी), लायक ईस्माईल खुरेशी, (व्यापारी),बीलाल अजीब खुरेशी,साबेर सत्तार खुरेशी, अ.क्र. ०४ ते ०५ रा अंबाजोगाई जि.बीड, तसेच अजीम नशीब पठाण, रा. रोजामोहल्ला ता. केज जि.बीड, यांचे विरुध्द वरील वर्णनाचे व किंमतीचे गोवंश जातीचे जनावरे क्रुरतेने निर्दयीपणे क्षमतेपेक्षा जास्त भरुन आयशर टैम्पोमध्ये भरुन त्यांची कत्तल करण्यासाठी घेवुन जात असतांना मिळुन आल्याने वर नमुद आरोपीविरुध्द पोलीस नाईक दिलीप गित्ते यांचे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे केज येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई ही श्री. नंदकुमार ठाकुर, पोलीस अधीक्षक, बीड, श्रीमती चेतना एस. तिडके, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली श्री. कमलेश मीना, सहा. पोलीस अधीक्षक, उपविभाग केज यांचे आदेशाने पोलीस नाईक दिलीप गित्ते, अनिल मंदे, विकास चोपने, अशफाक ईनामदार, पोलीस हवालदार मल्लीकार्जुन माने यांचे पथकाने केली आहे.

# तहसील कार्यालयात मतदार जनजागृती अंतर्गत रांगोळी स्पर्धेचे आयोजन संपन्न







**वादळवार्ता/केज**

दिनांक १५/०४/२०२४ रोजी तहसील कार्यालय केज येथे मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप प्रोग्राम अंतर्गत रांगोळी स्पर्धा आयोजीत करण्यांत आलेली होती. सदर स्पर्धेमध्ये सरस्वती कन्या प्रशाला केज, वि.दा. कराड वि. केज, सानेगुरुजी निवासी प्रा.वि. केज, स्वामी विवेकानंद वि. केज, या शाळेतील विद्यार्थ्यांनी रांगोळी स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला. सदर उपक्रमांस श्री. दीपक वजाळे सहाय्यक निवडणूक अधिकारी यांनी भेट देवुन स्पर्धकांना प्रोत्साहीत केले तसेच श्री. तरंगे सर तहसीलदार अंबाजोगाई व श्री. जगताप सर तहसीलदार केज यांनी मतदान करण्यांविषयी आवाहन केले. व श्री. बेडसकर एल बी गटशिक्षणाधिकारी केज यांच्या नेतृत्वाखाली चालू असलेल्या स्वीप उपक्रमांचे कौतुक केले. सदर कार्यक्रमांस कार्यालयीन कर्मचारी व शिक्षक यांचा मोठा सहभाग होता.

# अंबाजोगाईत ज्येष्ठ विचारवंत डॉ.उदय निरगुडकर यांचे व्याख्यान



**वादळवार्ता/अंबाजोगाई**

ज्येष्ठ विचारवंत तथा पत्रकार डॉ.उदय निरगुडकर यांचे दि.२१ एप्रिल रविवार रोजी आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह येथे सायंकाळी सहा वाजता "विश्वगुरु भारत" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

डॉ. उदय निरगुडकर हे महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत व पत्रकार म्हणून सर्वत्र परिचित आहेत. राज्यभर विविध विषयांवर त्यांची व्याख्याने सुरूच असतात. अंबाजोगाईत ही युवकांना प्रेरणा मिळावी. नव्या भारताची नवीन राष्ट्र म्हणून निर्माण झालेली ओळख. या विषयावर त्यांचे व्याख्यान होणार आहे. या व्याख्यानासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन येथील भारतीय जैन संघटना, वसुंधरा सेवा प्रतिष्ठान, दीनदयाळ नागरी सहकारी बँक, अस्तित्व महिला संघटन, घुगे हार्ट अँड क्रिटिकल केयर हॉस्पिटल यांनी केले आहे.

# नासिक लोकसभा निवडणूक रिंगणातून छगन भुजबळ यांची माघार



**दैनिक वादळ वार्ता**
**नाशिक/सुरेश इंगळे**

नाशिक लोकसभा निवडणुकीच्या रिंगणातून छगन भुजबळ यांनी माघार घेतली असून त्यांनी मुंबई येथे पत्रकार परिषद घेऊन मी माघार घेत असल्याची घोषणा केली . त्यामुळे नाशिक मधून उमेदवारी विषयीच्या चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे. भुजबळ यांनी नाशिकच्या जागे विषयी समीर भुजबळ यांच्यासाठी मागणी केली होती, मात्र अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांनी तुम्हीच नाशिकची जागा लढवावी अशी इच्छा दर्शवली होती. गृहमंत्री अमित शहा यांनी माझ्यावर विश्वास दाखवून माझ्या नावाची शिफारस केल्याने मी त्यांचे धन्यवाद मानतो, माझे नाव चर्चेत आल्यामुळे सर्व समाजातील बंधू भगिनींनी मला सपोर्ट केला, त्या सगळ्यांचे मी आभार मानतो, तसेच नाशिकमध्ये महाविकास आघाडीचा प्रचार सुरू झालेला आहे. महायुतीचा मात्र अजूनही तिढा कायम होता, महायुतीकडून उशीर होत असल्यामुळे नुकसान ही होऊ शकतो. समोरच्याचा प्रचार जोरात सुरू असल्यामुळे ताबडतोब निर्णय घेणे गरजेचे होते. दरम्यान छगन भुजबळ यांनी माघार घेतल्याने शिंदे गटाचे हेमंत गोडसे यांचा मार्ग सुकर झाला आहे.

# कोयता दाखवून नेता होणा-यानी ऊसतोड मजुरांचे दु:ख कमी करण्यासाठी काय केले ?

## बजरंग सोनवणेंचा पंकजा मुंडेंवर हल्लाबोल



**वादळवार्ता/गेवराई**

कोयता दाखवून नेता होणाऱ्यानी ऊसतोड कामगारांच्या व्यथा, कष्ट, अडीअडचणी व दुःख कमी करण्यासाठी त्यांनी काय प्रयत्न केले ? त्यांना ऊस तोडणी करून मोळ्या वाहता येतील का ? अशा खरमरीत शब्दात इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी ऊसतोड कामगारांच्या नेत्या म्हणणाऱ्या पंकजाताईचे नाव न घेता हल्लाबोल केला.

गेवराई तालुक्यात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे हे प्रचारादरम्यान बोलत होते. यावेळी माजी आमदार बदामराव पंडित, पूजाताई मोरे, युवा नेते युद्धजीत पंडित यांच्यासह इंडिया आघाडीतील घटक पक्षांचे नेते पंढरीनाथ लगड, अण्णासाहेब राठोड, पँथर्स रिपब्लिकन पार्टीचे धम्मापाल कांडेकर, अमोल करांडे, आम आदमी पार्टीचे अशोक येडे, शिवसेनेचे हनुमंत इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

गेवराई तालुक्यातील बाग पिंपळगाव, पिंपळगाव कॅम्प, गोपाळवस्ती (बेलगाव), बेलगाव, धोंडराई फाटा, धोंडराई, तळणेवाडी, भोजगव वस्ती, भोजगाव, बोरीपिंपळगाव, उमापुर, हिवरवाडी, महाडूळा फाटा, खळेगाव, वाहेवाडी, माटेगाव, कुंभेजळगाव, रामनगर तांडा, भाट अंतरवली या गावात मतदारांशी संपर्क साधत गाठीभेटी घेतल्या.

# जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा देवूळगाव येथे शाळा पूर्वतयारी मेळावा उत्साहात साजरा

**वादळवार्ता/देऊळगाव**

देवुळगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा देऊळगाव येथे शुक्रवारी दि.१९ एप्रिल २०२४ रोजी शाळा पूर्वतयारी पहिला मेळावा घेण्यात आला .सकाळी गावात प्रवेश दिंडी काढण्यात आली.त्यानंतर मुख्याध्यापक श्री जे के लोखंडे सर व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री सूनीलभाऊ माळी यांनी विद्यार्थी व पालकांना गुलाब पुष्प व खाऊ देवून स्वागत केले.शाळा पूर्वतयारी मेळाव्यात पहीलीचे नवीन विद्यार्थी यांची नावं नोंदणी, वजन - उंची , शारीरिक विकास, बौद्धिक विकास,सामाजिक व भावनात्मक विकास,भाषा विकास ,गणन पूर्व तयारी , साहित्य वाटप व पालकांना जि प चा शाळेमध्ये प्रवेश घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी ग्रामपंचायत उपसरपंच श्री नीरजभाऊ ठाकूर , माजी ग्रामपंचायत सरपंच श्री नीतू भाऊ ठाकूर , सेवानिवृत्त शिक्षक श्री चिमण तडवी सर व इतर ग्रामपंचायत सदस्य तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री सूनिलभाऊ माळी व सदस्य यांच्यासह अंगणवाडी सेविका व मदतनीस इयत्ता पहिली प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे पालकांची उपस्थिती होती.हा मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका श्रीमती सुनिता घंटेवाड मॅडम , अश्विनी कांबळे मॅडम , वैशाली निसर्गन मॅडम ,कोमल इंगळे मॅडम व प्रतिक्षा मोघे मॅडम या शिक्षक भगिनींनी परिश्रम घेतले.



संपादकीय

# सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ताँ: कवी मुहम्मद इक्बाल!

(मुहम्मद इक्बाल पुण्यस्मरण.)

सर मुहम्मद इक्बाल हे सन १९३०मध्ये मुस्लिम लीगचे अध्यक्ष निवडले गेले. त्यांनी मुसलमानांसाठी स्वतंत्र पाकिस्तानची योजना मांडून ती कार्यान्वित होण्याची मागणी केली. त्यांच्या काव्यात तात्त्विक, धार्मिक, नैतिक, राजकीय विचारांचा मिलाफ व कलात्मक आविष्कार आढळतो. कवी व तत्त्वज्ञ अशा दोन्ही भूमिकांचा त्यांच्या काव्यात आविष्कार असल्यामुळे त्यांच्या काव्याबाबत टीकाकारांत तीव्र मतभेद आहेत. त्यांच्या काव्यावर आतापर्यंत अनेक टीकाग्रंथ लिहिले गेले. मानवाच्या अमर्याद आत्मशक्तीवर त्यांच्या तत्त्वज्ञानात विशेष भर दिलेली आढळते. स्वप्रयत्नाने आणि चारित्र्याने माणूस स्वत:चा विकास स्वत:च करू शकतो, अशी त्यांची धारणा होती. उर्दूपेक्षा त्यांचे फार्सी काव्यलेखन अधिक दर्जेदार व महत्त्वपूर्ण मानले जाते. अधिक माहितीसाठी श्री. कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी यांचा हा लेख जरूर वाचाच... संपादक.

सर मुहम्मद इक्बाल हे उर्दूचे व फार्सीचे एक थोर कवी व विचारवंत होते. "इक्‌बाल" हे त्यांचे कवितेतील टोपणनाव होय. त्यांचे पूर्वज काश्मीरी ब्राह्मण होते. इक्बाल यांचा जन्म दि.२२ फेब्रुवारी १८७३ रोजी सियालकोट येथे झाला. सिलायलकोट येथील मरे कॉलेजमध्ये त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण झाले व लाहोर येथून त्यांनी तत्त्वज्ञानात एमएची पदवी घेतली. नंतर जर्मनीतील म्यूनिक येथे जाऊन त्यांनी तत्त्वज्ञानात डॉक्टरेट मिळविली. इंग्रजी, जर्मन, फार्सी आणि उर्दू या चार भाषांवर त्यांचे अगाध प्रभुत्व होते. सन १९०८ साली ते इंग्लंडहून बॅरिस्टर होऊन स्वदेशी परतले. सुरुवातीस त्यांनी लाहोर कॉजेलातील प्राध्यापकाची नोकरी पत्करली. परंतु थोड्याच दिवसांत ती सोडून दिली व शेवटपर्यंत वकिलीचा व्यवसाय केला. लहानपणापासून ते कविता करीत होते. त्यांच्यावर सुरुवातीस सूफी विचारांचाही प्रभाव होता. "हिदायतु-उल् इस्लाम" या संस्थेच्या सभांमधूनही ते आपल्या कवितांचे वाचन करीत. आपली ओजस्वी आणि राष्ट्रीय कविता त्यांनी सुरुवातीच्या काळातच लिहिली ती अशी-

"सारे जहाँसे अच्छा;
हिंदोस्ताँ हमारा"
हम बुलबुले है जिसकी;
यह गुलसिताँ हमारा!!"

युरोपातील तीन वर्षांच्या वास्तव्याने त्यांचा आरंभीचा राष्ट्रीय दृष्टिकोन सर्वस्वी बदलला आणि ते पूर्ण इस्लामवादाकडे वळले. त्यावेळी तुर्कस्तानची स्थिती आणि सत्ता डळमळीत झालेली होती, इराणवर रशियाचा डोळा होता आणि उत्तर आफ्रिकेच्या ट्रिपोलीवरील मुसलमानी सत्ता संपुष्टात आली होती. इस्लामच्या या अवनतीच्या काळातच त्यांनी आपली प्रसिद्ध व हृदयस्पर्शी कविता लिहिली. सर्व इस्लामवादाचा गडद प्रभाव त्यांच्या विचारसरणीवर असल्यामुळे ते नंतर उर्दूऐवजी फार्सीत लेखन करू लागले. फार्सीचा आश्रय घेतल्याने आपले लेखन व तत्त्वज्ञान यांचा प्रसार सर्व इस्लामी राष्ट्रांत होऊ शकेल, अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या तात्त्विक विचारसरणीवर आंरी बेर्गसाँ आणि फ्रीड्रिख नीत्शे यांच्या विचारांचा पगडा होता. हे त्यांच्या असरारे खुदी आणि रूमूजे बे खुदी या दोन फार्सी खंडकाव्य-मस्‌नवींवरून स्पष्ट दिसते. या दोन्ही मस्‌नवींचा इंग्रजी अनुवाद केंब्रिजचे प्राध्यापक निकल्सन यांनी केला. इक्बाल यांना सन १९२२मध्ये "सर" हा किताबही या ग्रंथांमुळेच बहाल करण्यात आला. त्यांच्या लेखनाला जागतिक कीर्ती लाभली. दांतेकृत डिव्हाइन कॉमेडीच्या धर्तीवर त्यांच्या फार्सी काव्यांचे पयामे मशरिक आणि जावेदनामा हे संग्रह निघाले. सन १९३५पासून ते पुन्हा उर्दूत लेखन करू लागले. बाले जिब्रैल आणि जर्बे-कलीम हे दोन उर्दू काव्यसंग्रह त्यांनी आयुष्याच्या अखेरीअखेरीस लिहिले. त्यांच्या प्रगत विचारांचे दर्शन या संग्रहांतून घडते. त्यांच्या आरंभीच्या उर्दू कविता बाँगे दरा या संग्रहात आहेत. हैदराबाद, म्हैसूर, मद्रास व अलीगढ येथे त्यांनी इंग्रजीत जी व्याख्याने केली, त्यांचा संग्रह लेक्चर्स ऑन द रिकन्स्ट्रक्शन ऑफ रिलिजस थॉट इन इस्लाम या नावाने प्रसिद्ध झाला. इस्लाम धर्मावरील त्यांचे महत्त्वाचे तात्त्विक विचार त्यात आलेले आहेत. त्यात त्यांनी आपले सूफीविरोधी आणि कर्मयोगाची शिकवण देणारे तत्त्वज्ञान मांडले आहे. "जगातील सर्व मुसलमानांनी संघटित व्हावे व कुराणप्रणीत आचरण ठेवावे. राष्ट्रीयतेची भावना इस्लामला मारक आहे. पाश्चत्त्य संस्कृती निसर्गरहस्ये उलगडण्याची धडपड करीत असली, तरी तिला परमेश्वरी निष्ठेचे अधिष्ठान नाही. लोकसत्ताक पद्धती निरर्थक आहे, कारण तीत केवळ माणसे मोजली जातात, त्यांचे मूल्यामापन होत नाही." अशी मते त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादिली आहेत. "सारे जहाँसे अच्छा..." यासारख्या ओळी सुरुवातीस लिहिणारे इक्बाल आता अशा ओळी कोरू लागले-

"चिनो अरब हमारा,
हिंदोसिताँ हमारा!
मुस्लीम हैं हम, वतन हैं
सारा जहाँ हमारा!!"

सर मुहम्मद इक्बाल हे सन १९३०मध्ये मुस्लिम लीगचे अध्यक्ष निवडले गेले आणि त्यांनी मुसलमानांसाठी स्वतंत्र पाकिस्तानची योजना मांडून ती कार्यान्वित होण्याची मागणी केली. त्यांच्या काव्यात तात्त्विक, धार्मिक, नैतिक, राजकीय विचारांचा मिलाफ व कलात्मक आविष्कार आढळतो. कवी व तत्त्वज्ञ अशा दोन्ही भूमिकांचा त्यांच्या काव्यात आविष्कार असल्यामुळे त्यांच्या काव्याबाबत टीकाकारांत तीव्र मतभेद आहेत. त्यांच्या काव्यावर आतापर्यंत अनेक टीकाग्रंथ लिहिले गेले. मानवाच्या अमर्याद आत्मशक्तीवर त्यांच्या तत्त्वज्ञानात विशेष भर दिलेली आढळते. स्वप्रयत्नाने आणि चारित्र्याने माणूस स्वत:चा विकास स्वत:च करू शकतो, अशी त्यांची धारणा होती.

# शेतकऱ्यांचा वाली कोन ?

सद्यस्थितीत शेतकऱ्यांवर काय संकट आलय , त्यात शेतकरी वर्गाचे किती कसे कसे हाल झाले आहेत , तो या रोगाचा सामना करत करत असतांना नैसर्गिक आपत्तींचा ही शिकार होतोय .हे कोणी पहात आहे की नाही ही खूप मोठी शोकांतिका आहे

आज पहायला गेलं तर महाराष्ट्र मधील अनेक जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकरी बेहाल झाला आहे.त्यांनी केलेली मेहनत व गाळलेल्या घामाच निसर्गान चांगलच फळ दिलं आहे. सतत असं निसर्गाच शेतकऱ्यां सोबत क्रूर वागणं थांबेणा झाले आहे , सारखाच निसर्ग हा शेतकऱ्यांच्या मागे हात धुऊन लागल्या सारखा वागत आहे. तसं पाहायला गेलं तर हे आजचे च काही नवीन नाही मागील वर्षी ही निसर्गान शेतकऱ्यांचा असाच छळ लावला होता , अनं या ही वर्षी तो पदरात आलेले पिंक घालवत आहे .शेतकऱ्यांच्या आयुष्यात निसर्गानं सुखं कधीच दिलं नाही याच कारणांमुळे शेतकरी प्रत्येक वर्षी कर्ज बाजारी होतोय .त्यांच्या आयुष्यात निसर्ग कधीच चांगला वागत नाही , अन चांगला वागला जरी तरी मात्र तो वर्षांनी वर्ष टिकून राहत नाही .निसर्ग जर प्रत्येक वर्षी चांगला च राहिला तर कोण्याही शेतकऱ्यांवर कर्ज बाजारी पणाची वेळ येणार नाही , त्याला कोणासमोर हाथ पसरावे लागणार नाहीत .पण असे होत नाही , निसर्ग कधीच त्याला सूधरु देत नाही , निसर्ग जर नीट वागला तर शेतकरी रस्त्यावर येणारं नाही ना , त्याचं जगणं वाऱ्यावर होणार नाही , सर्व शेतकरी सुखी होतील , त्यांना कोणाची गरज राहणार नाही ना , म्हणून निसर्ग नेहमी क्रूर वागतोय साऱ्या शेतकऱ्यांबरोबर असंच म्हणावं लागंल .



निसर्गाला वाटत नाही कधी कोण्या शेतकऱ्यांच चांगल व्हाय , चांगल झाल्यावर त्यांची मुलं शिकून मोठी होतील ना , त्याला सतत याच्या त्याच्या दारी पळायची वेळ येनार नाही ना , म्हणुन घेतोय की काय हा सूड सर्व शेतकरी वर्गांचा .

निसर्गाच्या ह्या सतत बदलत्या वागन्या मुळे अता शेतकऱ्यांचे वाली कोणी उरलेच नाही असं वाटायला लागलं आहे . प्रत्येकक्षात त्याचा छळ निसर्गानंच सुरू केला तर बाकीच्यांना दोष देऊन ही काय होणार आहे .तरीही मात्र सर्व शेतकऱ्यांनी विचार करण्यासारखी चिंतेची बाब आहे , जेंव्हा निवडनुका लागल्या होत्या , तेंव्हा अनेक नेत्यांनी मोठं मोठ्या सभा गाजवल्या होत्या , प्रत्येक सभेत प्रत्येक पक्षातील प्रत्येक नेता प्रत्येक वेळी शेतकऱ्यांन बद्दल किती आपुलकी आणि प्रेम दाखवत होता , काय काय त्या घोषणा करत होता , मंग आज या संकटात काय होत आहे त्याला शेतकऱ्यांच्या बांधावर येऊन शेतकऱ्यांची किती नुसकान झाले आहे ते पहायला , का कोणी येत नाहीये निसर्गानं शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडलं म्हणुन नेत्यांनी देखील तेच करायच का .कुठं गेलं शेतकऱ्यांवरील साऱ्याच प्रेम , की फक्त सभेपुरते होते ते ? शेतकऱ्यांच्या पिकांचा पंचनामा सुध्दा वेळेवर होत नाही कधी मुगाचे पिंक नासुन जात तिथं ज्वारी पेरल्या च्या नतंर पंचनामा करण्यासाठी येतात ही किती दुर्दैवाची बाब आहे , शेतकऱ्यांनी पिकांचा पंचनामा करण्यासाठी किती ही कालावधी गेलेलं पिंक तसंच ठेवायच का , त्यात दुसरं घेऊ नये का , किती वाईट अवस्था आज शेतकऱ्यांची निसर्गान करुन ठेवली आहे , त्याला सरकार मदत मात्र देते पण वेळेवर का देत नाही ? सरकारची का अशी व्यवस्था असेल अरे खरी गरज असते पिंक उध्वस्त झाल्या झाल्या पण तसं कधीच होत नाही काही काही वेळा अनुदानाचे पैसे येतात वरीस सहा महिन्याने तोपर्यंत शेतकऱ्यांचा राहिला साहीलेला माल तयार होऊन त्याचे देखील जीवनाला थोडा हातभार लागलेला असतो मंग अश्या वेळी अनुदान देऊन मदत होणार का ? , योग्य वेळी तात्काळ का मदत करत नाही कोणी , खरं तर असं वाटायला लागलं आहे .या जगात शेतकऱ्यांच कोणी च नाहीये फक्त सामजिक लोकप्रियता मिळवण्यासाठी शेतकऱ्यांच्या नावाने मोठं मोठ्या घोषणा करत होते की काय , पण आज त्यांच्यावर दु:ख कोसळल आहे तर त्याला सावरायला कोणीच येत नाही असं का ? ,



अरे साऱ्या जगाला जगवानाऱ्या शेतकऱ्यांच्या डोळ्यात आज अश्रू वाहात आहेत त्या अश्रू ना पुसणारे कोणीच कसे उरले नाही ही खूप मोठी खंत येथील प्रत्येक शेतकऱ्यांला वाटत असेल ना .माय बापानो खरच शेतकरी टिकला तरच जग टिकणार आहे , मंग त्याला का आधार देत नाही कोणी ? का योग्य वेळी मदत मिळत नाही , प्रत्येक संकटात का त्याला वाऱ्यावर सोडलं जातंय , का त्यांच्या मुलांचा शिक्षणाचा खर्च कमी करत नाही कोणी .अश्या खूप काही बाबी आहेत ज्या काळजाला कुरतडुंन टाकून मनात वेदना दाटून आणतात .जगाला कोणाचं घेणं देणं नाहीये शेतकरी वाचला काय अन नाही वाचला काय कुणाच काही होत नाहीये . फक्त दु:ख होतंय ते फक्त आणि फक्त शेतकऱ्यांलाच म्हणुन वाटतय या जगात शेतकऱ्यांच कोनी वाली उरलाच नाही तो प्रत्येक संकटात नेहमी एकटाच लढतोय जगाला त्यांच्या जगण्या मारण्याची काहीही चिंता नाहीये की काय ? असं वाटायला लागले आहे .

**अंगद दराडे**
**माजलगाव बीड**
**8668682620**

# सिन्नरच्या बेपत्ता व्यावसायिकाचा मृतदेह इगतपुरी घाटनदेवी जंगलात सापडला.

**दैनिक वादळ वार्तानाशिक/ सुरेश इंगळे**



सिन्नर शहरातील विजयनगर येथील रहिवासी बॅटरी व्यवसायिक मुकुंद पुरुषोत्तम सारडा (५०) यांचा मृतदेह तब्बल एक आठवड्यानंतर इगतपुरी तालुक्यातील घाटणदेवीच्या जंगलात आढळून आला. त्यांनी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. गुरुवारी (ता१८) दुपारी इगतपुरी पोलिसांना घाटणदेवीच्या जंगलात अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आल्याचे समजले, पोलिसांनी त्यांच्या मृतदेहाची तपासणी केली असता त्यांना मुकुंद सारडा असल्याची ओळख पटली, श्री सारडा यांचा सिन्नर येथे इलेक्ट्रिक बॅटरी रिपेरिंग व विक्रीचा व्यवसाय आहे. गेल्या शुक्रवारी ते घरातून दुकानात जाण्यासाठी निघाले होते परंतु ते दुकानात पोहोचलेच नाही, तेव्हापासून ते बेपत्ता झाल्याचे कळते, त्यांच्या कुटुंबीयांनी सिन्नर पोलीस ठाण्यात जाऊन हरवल्याची तक्रार दिली होती. आठवडाभर नातेवाईक व सिन्नर पोलीस यांचा सर्वत्र शोध घेत होते. परंतु तब्बल एक आठवड्यानंतर त्यांचा मृतदेह सापडल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांना मोठा धक्का बसला आहे. या संदर्भात इगतपुरी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आह.

# एम.आय.टी.रोटेगाव येथे पालक मार्गदर्शन मेळावा-२०२४ संपन्न

**दैनिक वादळवार्ता**
**वैजापूर/चैताली ओटे**

विद्यार्थ्यांना सतत प्रश्न पडले पाहिजेत. प्रश्न पडले तरच त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आपण प्रयत्न करतो. आणि ज्याला प्रश्नांची उत्तरे मिळतात, तो आयुष्यात यशस्वी होतोच. हे यशामागील गुपित असल्याचे ग्रामौद्योगिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ.यज्ञवीर कवडे यांनी एम.आय.टी. पॉलिटेक्निक रोटेगाव येथे आयोजित केलेल्या 'पालक मार्गदर्शन मेळावा-२०२४ मध्ये पालक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले. तर विद्यार्थ्यांनी स्वयंप्रेरित होऊन ज्ञान आत्मसात करावे. तसेच यश प्राप्तीसाठी कठोर परिश्रमाला पर्याय नाही, असे एम.आय.टी. छत्रपती संभाजीनगर येथील संचालक प्रा.डॉ.निलेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करतांना केले. तसेच याच संस्थेतील ॲग्रिकल्चरल इंजिनिअरींग शाखेचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.दीपक बोरनारे यांनी शेती क्षेत्रात होणारे बदल, आधुनिक शेती म्हणजे काय? तसेच या क्षेत्रात असणाऱ्या सरकारी व खाजगी क्षेत्रात नोकरी आणि व्यवसायाच्या संधींविषयी सविस्तर माहिती विद्यार्थी व पालकांना करून दिली. प्रा.वासुदेव उपाध्ये, डायरेक्टर इन्फ्रास्ट्रक्चर यांनी सिव्हिल इंजिनिअरिंग क्षेत्रात असणाऱ्या विविध सरकारी खाजगी नोकरी व व्यवसाय विषयक सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. कंप्यूटर इंजिनिअरींग विभाग प्रमुख प्रा.डॉ.स्मिता कासार यांनी मुलींसाठी उच्च शिक्षण मोफत असल्याचे सांगून याचा मुलींनी फायदा घ्यावा, असे आवाहन केले. मुलींनी इंजिनिअरींग क्षेत्रात मुलांच्या बरोबरीने आपलं स्थान निर्माण करावे असेही सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. डॉ.बाबासाहेब सोनवणे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली, तर संस्थेचे प्राचार्य प्रा.किशोर पाटील यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा सादर केला. याप्रसंगी संस्थेचे कंप्यूटर इंजिनिअरींग विभागाचे माजी विद्यार्थी श्री.सौरभ लोखंडे, सिव्हिल इंजिनिअरींग विभागाचे माजी विद्यार्थी श्री. शेख नावेद आणि मेकॅनिकल इंजिनिअरींग विभागाचे माजी विद्यार्थी श्री. सचिन आव्हाळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला व आपले अनुभव कथन केले.

याप्रसंगी एम.एस.बी.टी.ई.ने सुरु केलेल्या द्विभाषिक अभ्यासक्रमाच्या फायद्याविषयी सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थिनी कु.शितल जेऊघाले हिने डिप्लोमाचा अभ्यास मातृभाषेतून करता येत असल्याने त्याचे आकलन व परीक्षेमध्ये उत्तर लिखाणासाठी खूप फायदा होत असल्याचे सांगितले. त्यामुळे डिप्लोमा किंवा इंजिनिअरिंग करणाऱ्या विद्यार्थ्यांनी इंग्रजीची भीती न बाळगता इंजिनीयर होण्याचे स्वप्न पूर्ण करता येते असल्याचे सांगितले. याप्रसंगी हिवाळी परीक्षा-२०२३ मध्ये प्रथम वर्षातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच इंटर डिप्लोमा इंजिनिअरिंग स्टुडन्ट स्पोर्ट्‌स असोसिएशनच्या माध्यमातून (मुलींचा गट) राज्य स्तरावर रनिंग या क्रीडा स्पर्धेत सांघिक व वैयक्तिक यश मिळवणाऱ्या विद्यार्थिनी कु.प्रियंका कठाळे, कु.पल्लवी कठाळे, कु.नम्रता मोईन, कु.पूजा ठोंबरे यांचा देखील सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विवेक जोशी यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. निलेश सोनवणे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व विभाग प्रमुख प्रा.स्वप्निल पाठक, प्रा. गणेश भिसे, प्रा. विलास जाधव, प्रा. एस.राम आणि प्रा.सागर सहाने यांनी यांनी विशेष परिश्रम घेतले.




---

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज,जिल्हा बीड एम.ए.जी.विभाग**
ई-मेलKAIJTAHSILDAR@GMAIL.COM दुरध्वनी क्र.०२२४५-२५२६४५

क्र.२०२४/एम.ए.जी/कावि/४९९ **दिनांक :-२६/०३/२०२४**

## जाहिर नामा

सर्व जनता मौजे **केज** ता. केज यांना जाहीर केले जाते की, केज येथील जन्म पावलेला इसम नामे **अत्थर खाजामियॉ (कठालु ) इनामदार** याचा जन्म दिनांक ०५/०१/१९८१ रोजी झालेला असुन व जन्म नोंद आदेश नगर पंचायत केज यांना देणे बाबत त्यांची आई नामे **जैबुन्निसा खाजामियाँ इनामदार** यांनी या कार्यालयास दि.१९.०३.२०२४ रोजी अर्ज सादर करुन सोबत नगर पंचायत केज यांचे नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व १०० रुपयाचे स्टॅम्पवर शपथपत्र सादर करुन नगर पंचायत केज ता. केज यांना त्यांच्या मुलाचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.
**२/-अत्थर खाजामियॉ (कठालु ) इनामदार** याचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व नगर पंचायत कार्यालय केज ता. केज यांना **जन्म** नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षारित/-
**कार्यकारी दंडाधिकारी केज**

---

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज,जिल्हा बीड एम.ए.जी.विभाग**
ई-मेलKAIJTAHSILDAR@GMAIL.COM दुरध्वनी क्र.०२२४५-२५२६४५

क्र.२०२४/एम.ए.जी/कावि/५०० **दिनांक :-२६/०३/२०२४**

## जाहिर नामा

सर्व जनता मौजे **केज** ता. केज यांना जाहीर केले जाते की, केज येथील जन्म पावलेला इसम नामे **सुलतानाबेगम कठालुमियॉ इनामदार** हिचा जन्म दिनांक १९/०७/१९५९ रोजी झालेला असुन व जन्म नोंद आदेश नगर पंचायत केज यांना देणे बाबत त्यांची सावत्र आई नामे **जैबुन्निसा खाजामियॉ ( कठालुमियॉ ) इनामदार** यांनी या कार्यालयास दि.१९.०३.२०२४ रोजी अर्ज सादर करुन सोबत नगर पंचायत केज यांचे नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व १०० रुपयाचे स्टॅम्पवर शपथपत्र सादर करुन नगर पंचायत केज ता. केज यांना त्यांच्या मुलीचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.
**२/-सुलतानाबेगम कठालुमियॉ इनामदार** हिचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व नगर पंचायत कार्यालय केज ता. केज यांना **जन्म** नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षारित/-
**कार्यकारी दंडाधिकारी केज**

---

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज,जिल्हा बीड एम.ए.जी.विभाग**
ई-मेलKAIJTAHSILDAR@GMAIL.COM दुरध्वनी क्र.०२२४५-२५२६४५

क्र.२०२४/एम.ए.जी/कावि/५०१ **दिनांक :-२६/०३/२०२४**

## जाहिर नामा

सर्व जनता मौजे **केज** ता. केज यांना जाहीर केले जाते की, केज येथील जन्म पावलेला इसम नामे **मुखीद रुकनोद्दीन इनामदार** याचा जन्म दिनांक ०५/०६/१९६६ रोजी झालेला असुन व जन्म नोंद आदेश नगर पंचायत केज यांना देणे बाबत त्यांची सावत्र आई नामे **जैबुन्निसा खाजामियाँ इनामदार** यांनी या कार्यालयास दि.१९.०३.२०२४ रोजी अर्ज सादर करुन सोबत नगर पंचायत केज यांचे नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व १०० रुपयाचे स्टॅम्पवर शपथपत्र सादर करुन नगर पंचायत केज ता. केज यांना त्यांच्या सावत्र मुलाचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.
**२/-मुखीद रुकनोद्दीन इनामदार** याचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व नगर पंचायत कार्यालय केज ता. केज यांना **जन्म** नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षारित/-
**कार्यकारी दंडाधिकारी केज**

---

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज,जिल्हा बीड एम.ए.जी.विभाग**
ई-मेलKAIJTAHSILDAR@GMAIL.COM दुरध्वनी क्र.०२२४५-२५२६४५

क्र.२०२४/एम.ए.जी/कावि/५०२ **दिनांक :-२६/०३/२०२४**

## जाहिर नामा

सर्व जनता मौजे **केज** ता. केज यांना जाहीर केले जाते की, केज येथील जन्म पावलेला इसम नामे **फेरोज खाजामियॉ इनामदार** याचा जन्म दिनांक ०२/०८/१९८३ रोजी झालेला असुन व जन्म नोंद आदेश नगर पंचायत केज यांना देण्याबाबत त्यांची आई नामे **जैबुन्निसा खाजामियाँ इनामदार** यांनी या कार्यालयास दि.१९.०३.२०२४ रोजी अर्ज सादर करुन सोबत नगर पंचायत केज यांचे नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व १०० रुपयाचे स्टॅम्पवर शपथपत्र सादर करुन नगर पंचायत केज ता. केज यांना त्यांच्या मुलाचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे
**२/- फेरोज खाजामियॉ इनामदार** याचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन 15 दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व नगर पंचायत कार्यालय केज ता. केज यांना **जन्म** नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षारित/-
**कार्यकारी दंडाधिकारी केज**

---

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज,जिल्हा बीड एम.ए.जी.विभाग**
ई-मेलKAIJTAHSILDAR@GMAIL.COM दुरध्वनी क्र.०२२४५-२५२६४५

क्र.२०२४/एम.ए.जी/कावि/५०३ **दिनांक :-२६/०३/२०२४**

## जाहिर नामा

सर्व जनता मौजे **केज** ता. केज यांना जाहीर केले जाते की, केज येथील जन्म पावलेला इसम नामे **जैबुनिसा शब्बीर शेख** हिचा स्वत:चा जन्म दिनांक २६/०१/१९५१ रोजी झालेला असुन व जन्म नोंद आदेश मुख्याधिकारी नगर पंचायत केज यांना देणे बाबत नामे जैबुन्निसा शब्बीर शेख यांनी स्वतः या कार्यालयास दि.१९.०३.२०२४ रोजी अर्ज सादर करुन सोबत मुख्याधिकारी नगर पंचायत केज यांचे नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व १०० रुपयाचे स्टॅम्पवर शपथपत्र सादर करुन नगर पंचायत केज ता. केज यांना त्यांच्या स्वत:ची जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.
**२/-जैबुन्निसा शब्बीर शेख** हिचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व मुख्याधिकारी नगर पंचायत कार्यालय केज ता. केज यांना **जन्म** नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षारित/-
**कार्यकारी दंडाधिकारी केज**

---

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज,जिल्हा बीड एम.ए.जी.विभाग**
ई-मेलKAIJTAHSILDAR@GMAIL.COM दुरध्वनी क्र.०२२४५-२५२६४५

क्र.२०२४/एम.ए.जी/कावि/५०४ **दिनांक :-२६/०३/२०२४**

## जाहिर नामा

सर्व जनता मौजे **केज** ता. केज यांना जाहीर केले जाते की, केज येथील जन्म पावलेला इसम नामे **चाँदपाशा खाजामियॉ इनामदार** याचा जन्म दिनांक १५/०१/१९६१ रोजी झालेला असुन व जन्म नोंद आदेश नगर पंचायत केज यांना देणे बाबत त्यांची सावत्र आई नामे **जैबुन्निसा खाजामियाँ इनामदार** यांनी या कार्यालयास दि.१९.०३.२०२४ रोजी अर्ज सादर करुन सोबत नगर पंचायत केज यांचे नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व १०० रुपयाचे स्टॅम्पवर शपथपत्र सादर करुन नगर पंचायत केज ता. केज यांना त्यांच्या सावत्र मुलाचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.
**२/-चाँदपाशा खाजामियॉ इनामदार** याचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व नगर पंचायत कार्यालय केज ता. केज यांना **जन्म** नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षारित/-
**कार्यकारी दंडाधिकारी केज**

---

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज,जिल्हा बीड एम.ए.जी.विभाग**
ई-मेलKAIJTAHSILDAR@GMAIL.COM दुरध्वनी क्र.०२२४५-२५२६४५

क्र.२०२४/एम.ए.जी/कावि/५०५ **दिनांक :-२६/०३/२०२४**

## जाहिर नामा

सर्व जनता मौजे **केज** ता. केज यांना जाहीर केले जाते की, केज येथील जन्म पावलेला इसम नामे **रिहानाबी खाजामियॉ इनामदार** याचा जन्म दिनांक ०१/०१/१९७३ रोजी झालेला असुन व जन्म नोंद आदेश नगर पंचायत केज यांना देण्याबाबत त्यांची सावत्र आई नामे **जैबुन्निसा खाजामियाँ इनामदार** यांनी या कार्यालयास दि.१९.०३.२०२४ रोजी अर्ज सादर करुन सोबत नगर पंचायत केज यांचे नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व १०० रुपयाचे स्टॅम्पवर शपथपत्र सादर करुन नगर पंचायत केज ता. केज यांना त्यांच्या सावत्र मुलीचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.
**२/- रिहानाबी खाजामियॉ इनामदार** याचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व नगर पंचायत कार्यालय केज ता. केज यांना **जन्म** नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षारित/-
**कार्यकारी दंडाधिकारी केज**

---

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज,जिल्हा बीड एम.ए.जी.विभाग**
ई-मेलKAIJTAHSILDAR@GMAIL.COM दुरध्वनी क्र.०२२४५-२५२६४५

क्र.२०२४/एम.ए.जी/कावि/५०६ **दिनांक :-२६/०३/२०२४**

## जाहिर नामा

सर्व जनता मौजे **केज** ता. केज यांना जाहीर केले जाते की, केज येथील जन्म पावलेला इसम नामे **जफर पाशा खाजामियॉ इनामदार** याचा जन्म दिनांक १५/०६/१९७३ रोजी झालेला असुन व जन्म नोंद आदेश नगर पंचायत केज यांना देणे बाबत त्यांची सावत्र आई नामे **जैबुन्निसा खाजामियाँ इनामदार** यांनी या कार्यालयास दि.१९.०३.२०२४ रोजी अर्ज सादर करुन सोबत नगर पंचायत केज यांचे नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व १०० रुपयाचे स्टॅम्पवर शपथपत्र सादर करुन नगर पंचायत केज ता. केज यांना त्यांच्या सावत्र मुलाचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.
**२/- जफर पाशा खाजामियॉ इनामदार** याचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व नगर पंचायत कार्यालय केज ता. केज यांना **जन्म** नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षारित/-
**कार्यकारी दंडाधिकारी केज**

---

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज,जिल्हा बीड एम.ए.जी.विभाग**
ई-मेलKAIJTAHSILDAR@GMAIL.COM दुरध्वनी क्र.०२२४५-२५२६४५

क्र.२०२४/एम.ए.जी/कावि/५०७ **दिनांक :-२६/०३/२०२४**

## जाहिर नामा

सर्व जनता मौजे **केज** ता. केज यांना जाहीर केले जाते की, केज येथील जन्म पावलेला इसम नामे **यास्मीन बेगम खाजामियॉ इनामदार** याचा जन्म दिनांक १५/०४/१९७९ रोजी झालेला असुन व जन्म नोंद आदेश नगर पंचायत केज यांना देण्याबाबत त्यांची आई नामे **जैबुन्निसा खाजामियाँ इनामदार** यांनी या कार्यालयास दि.१९.०३.२०२४ रोजी अर्ज सादर करुन सोबत नगर पंचायत केज यांचे नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व १०० रुपयाचे स्टॅम्पवर शपथपत्र सादर करुन नगर पंचायत केज ता. केज यांना त्यांच्या मुलीचा **जन्म** नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.
२/- **यास्मीन बेगम खाजामियॉ इनामदार** याचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व नगर पंचायत कार्यालय केज ता. केज यांना **जन्म** नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षारित/-
**कार्यकारी दंडाधिकारी केज**

---

## श्रीरामाचे रूप

रघूकुलभुषणाचे
रूप साजिरे गोजिरे
करु कसे मी वर्णन
शब्द पडती अपुरे....

चैत्र मासी नवमीला
समयाला मध्यान्हाच्या
घेई जन्म चक्रपाणी
पोटी राणी कौसल्येच्या...

रूप लोभस बाळाचे
नेत्री साठवे जननी
बाळलीला श्रीरामाच्या
त्यात जाई ती रंगुनी....

श्यामवर्णी कमलाक्ष
राम दशरथात्मज
असे हा अजानुबाहू
भज मन राम भज...

मुख गोड मनोहर
शोभे दंतपंक्ती शुभ्र
भासे माला मौक्तिकाची
कांती जणू श्यामअभ्र.....

भाळी चंदनाचा टिळा
धारदार ती नासिका
रक्तवर्णी ओष्ठद्वय
वाटे गुलाब कलिका....

मत्स्याकार कुंडलांची
आभा शोभे मुखावरी
केश कुरळे मस्तकी
फुले सुगंधी त्यावरी....

वक्षी कौस्तुभाचा मणी
अंगी चंदनाची उटी
ब्रह्मस्थान नाभीवरी
पितांबर शोभे कटी....

आभुषणे दंडावरी
कडी मनगटामध्ये
कटी रत्नांची मेखला
हेमतोडे पायामध्ये....

प्रसन्नवदनी राम
सज्ज हाती चापबाण
शोभे जानकी वामांगी
बंधू शेजारी लक्ष्मण....

जितेंद्रिय धनुर्धारी
पुराणपुरुषोत्तम
करो रक्षण आमुचे
बलशाली रघुत्तम...

कसे वर्णू रुपगुण
तुझे कौसल्यानंदना
शब्द अपुरे पडती
तव गोड संकिर्तना..

सर्व सुखी असा कोण
ज्याच्या मुखी रामनाम
भजे जो केवळ राम
ध्यानी जयाच्या श्रीराम

नका सोडू रामनाम
जपा श्रीरामाचे नाम
मुखी नाम नेत्री ध्यान
त्याला प्राप्त विष्णु धाम....

रेवती कुलकर्णी, बेंगळुरू

# मनोज जरांगे पाटलाच्या उपोषणामुळेच लाखो कुणबी प्रमाणपत्राचे वाटप - अशोक हिंगे

**वादळवार्ता/बीड**

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी चालू केलेल्या मराठा आंदोलन उपोषणामुळे महाराष्ट्रात लाखो कुणबी प्रमाणपत्राचे वाटप झाले असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी सांगितले ते एका कार्यकर्ता बैठकीत बोलत होते पुढे बोलताना हिंगे म्हणाले की लोकशाहीला व घटनेला पायदळी तुडवू पाहणारे लोक उपोषणासारख्या आंदोलनाला नाव ठेवतात उपोषणाने काहीही होत नाही असे म्हणतात मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या घटनेने न्याय मागण्यासाठी उपोषण, मोर्चा, धरणे, करण्यासाठीचा अधिकार दिला आहे मात्र घटनेच्या पदावर बसलेल्या पंकजाताई मुंडेंना याचं भान नसावं म्हणूनच त्या उपोषणाने काही होत नसतं असे म्हणून जरांगे पाटलाला नाव ठेवत आहेत उपोषणामुळे महाराष्ट्रातील लाखो मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले आहे ही उपोषणाची क्रांती आहे लोकशाहीमध्ये निवडणुका लढवण्याचा अधिकार सर्वांना आहे मोर्चे आंदोलन करण्याचा अधिकार हे सर्वांना आहे आणि हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही आहे मात्र महाराष्ट्रातील भाजपा सरकारने सहा महिने चाललेल्या उपोषणाकडे दुर्लक्ष करून एक प्रकारे लोकशाहीची पायमल्ली करण्याचा प्रयत्न चालवला आहे म्हणूनच कदाचित पंकजाताईला वाटत असेल की उपोषणाने काही होत नाही महात्मा गांधींनी ही सत्याग्रह करूनच देशाला स्वातंत्र्य मिळवुन दिले. त्याचप्रमाणे मनोज जरांगे पाटलांनी उपोषण करून जवळपास लाखो मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्राचे वाटप केले ही किमया मनोज जरांगे पाटलाच्या उपोषणाची आहे हे पंकजाताईंना लक्षात घ्यायला हवं इथून पुढे तरी आपण घटनेच्या पदावर बसलेलो आहोत लोकशाहीची पायमल्ली होणार नाही याच भान ठेवून पंकजाताई मुंडे यांनी बोलावं असा सल्ला वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी केले आहे.



## तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज,जिल्हा बीड एम.ए.जी.विभाग

ई-मेलKAIJTAHSILDAR@GMAIL.COM दुरध्वनी क्र.०२२४५-२५२६४५

क्र.२०२४/एम.ए.जी/कावि/५०८ **दिनांक :-२६/०३/२०२४**

### जाहिर नामा

सर्व जनता मौजे केज ता. केज यांना जाहीर केले जाते की, केज येथील जन्म पावलेला इसम नामे **अदिब अकबर इनामदार** याचा जन्म दिनांक २३/१०/२००८ रोजी झालेला असुन व जन्म नोंद आदेश नगर पंचायत केज यांना देण्याबाबत त्यांचे वाडिल नामे अकबर खाजामियाँ इनामदार यांनी या कार्यालयास दि.१९.०३.२०२४ रोजी अर्ज सादर करुन सोबत नगर पंचायत केज यांचे नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व १०० रुपयाचे स्टॅम्पवर शपथपत्र सादर करुन नगर पंचायत केज ता. केज यांना त्यांच्या मुलाचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे. **२/- अदिब अकबर इनामदार** याचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व नगर पंचायत कार्यालय केज ता. केज यांना **जन्म** नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षारित/-

**कार्यकारी दंडाधिकारी केज**

## तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज,जिल्हा बीड एम.ए.जी.विभाग

ई-मेलKAIJTAHSILDAR@GMAIL.COM दुरध्वनी क्र.०२२४५-२५२६४५

क्र.२०२४/एम.ए.जी/कावि/५०९ **दिनांक :-२६/०३/२०२४**

### जाहिर नामा

सर्व जनता मौजे **केज** ता. केज यांना जाहीर केले जाते की, केज येथील जन्म पावलेला इसम नामे **दानीश फेरोज इनामदार** याचा जन्म दिनांक २७/०६/२०१६ रोजी झालेला असुन व जन्म नोंद आदेश नगर पंचायत केज यांना देण्याबाबत त्यांचे वाडिल नामे फेरोज खाजामियाँ इनामदार यांनी या कार्यालयास दि.१९.०३.२०२४ रोजी अर्ज सादर करुन सोबत नगर पंचायत केज यांचे नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व १०० रुपयाचे स्टॅम्पवर शपथपत्र सादर करुन नगर पंचायत केज ता. केज यांना त्यांच्या मुलाचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे. २/**-दानीश फेरोज इनामदार** याचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व नगर पंचायत कार्यालय केज ता. केज यांना **जन्म** नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी

स्वाक्षारित/-

**कार्यकारी दंडाधिकारी केज**


## ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ डॉ .दत्ता नलावडे यांची भारतीय मानव अधिकार परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी निवड

**वादळवार्ता/बीड**

बालविकास सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमाने विविध सामाजिक , शैक्षणिक व बालविकास क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारे डॉक्टर दत्ता नलावडे यांची नुकतीच भारतीय मानवाधिकार परिषदच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाली आहे . बाल विकास सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमाने म्हसोबा फाटा येथे संस्कृती विद्यालय व विवेकवर्धिनी गुरुकुल हा शिक्षण प्रकल्प डॉ . दत्ता नलावडे सर चालवतात .बाल मजूर ते बाल शिक्षण या क्षेत्रामध्ये निरंतर नलावडे सरांचं काम चालू आहे. याची दखल घेऊन भारतीय मानव अधिकार परिषदेने त्यांची जिल्हाध्यक्ष म्हणून निवड केली आहे. डॉ. दत्ता नलावडे हे गेली कित्येक वर्षे बाल कामगार, बालहक्क, शैक्षणिक चळवळ यामध्ये ते अग्रेसर असतात. नुकताच त्यांचा शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल 'रयत सामाजिक प्रतिष्ठान' तर्फे त्यांना आदर्श पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. ते संस्कृती विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष आहेत. ते स्वयं अर्थ सहाय्य मार्फत खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवीत आहेत. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे .



# निर्धूर चूली वापरण्याकडे महिलांचा कल



**दैनिक वादळ वार्ता**
**कुडूत्री/सुभाष चौगुले**

प्रामुख्याने स्त्रियांना रोज प्रदूषणाला तोंड द्यावे लागते. जेथे गॅसचा वापर होतो तेथे धूराचा त्रास नसतो. पण लाकूडफाटा वापरला तरी धूर होणार नाही अशा बिनधुराच्या चुली उपलब्ध आहेत त्यांत कमी इंधनातून जास्त उष्णता मिळते. तरी निर्धूर चुली आवश्यक आहेत. कौलव ता. राधानगरी येथिल शिवाजी कुंभार पारंपारिक गाडगी मडकी बनविण्याच्या व्यवसायाबरोबरच निर्धूर चुली बनवुन गावोगावी वितरीत करतात. गेल्या काही वर्षांपासून इंधनाची टंचाई ही एक गंभीर समस्या बनली आहे. देशात फार मोठया प्रमाणावर झाडतोड झाली आहे. चुलीकरिता लागणारे सरपण गोळा करण्यासाठी स्त्रियांना मैलोन् मैल पायपीट करावी लागते. अशाच वेगाने झाडतोड चालू राहिली आणि झाडांची लागवड केली गेली नाही तर येत्या काही वर्षांत अन्न शिजवायला इंधनच मिळणार नाही अशी परिस्थिती निर्माण होईल. जंगलतोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळतो आहे. उशिरा व अवेळी येणा-या पावसामुळे कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी होत आहे. जंगलतोडीला चोरटे जबाबदार आहेत. निसर्गावर अवलंबून असलेले मानवी जीवनही त्यामुळे असंतुलित होत आहे. संतुलन ढळू नये म्हणून भविष्यकाळासाठी नवीन झाडे लावण्याचा उपक्रम सरकार करत आहे. परंतु आपल्या देशात लाकूड फाटयाचा वापर इतक्या मोठया प्रमाणावर होतो आहे की, लाकूड फाटयाची मागणी आणि पुरवठा यांची सांगड घालणे कठीण आहे. ग्रामीण भागात घरगुती कारणासाठी लागणा-या एकूण उर्जेपैकी 80% ऊर्जा स्वयंपाकासाठी वापरली जाते. खेडयातील लोक वर्षानुवर्षे चुली वापरत आहेत परंतु ह्या चुलींची कार्यक्षमता कमीच आहे. पारंपरिक चुलींच्या क्षमतेत १% जरी वाढ झाली तरी प्रतिवर्षी लाखो टन लाकूड वाचेल. चुलीसाठी आवश्यक साहित्य बॉयलर सिमेंट, दगडाचा बारीक कच, बारीक गिट्टी , दगडाची भुकटी (पावडर), विटांची भुकटी, केमिकल हार्डवेअर, पाणी आवश्यकतेनुसार

निर्धुर चुलींचे फायदे

जळण आणण्यासाठी लागणारा वेळ व पैसा यात बचत हाते.जळण गोळा करण्यासाठी करावी लागणारी पायपीट कमी करावी लागते.चुलीवर व वैलावरही अन्न शिजत असल्यामुळे झटपट स्वयंपाक होऊन वेळेची बचत होते. चूल चांगली पेटल्याने धूराचे प्रमाण कमी होते. धुराडयावाटे धूर बाहेर टाकला गेल्यामुळे धुराने डोळयांना व छातीला होणारा त्रास कमी होतो. त्यामुळे आरोग्य चांगले राहते. भांडी कमी काळी होतात. चूल उत्तम पेटत असल्यामुळे फुंकण्याचे श्रम वाचतात. लाकूडफाटयाव्यतिरिक्त लाकडाच्या छोटया ढलप्या, गोव-या, बुरकुंडे, काटयाकुटया अशा सर्व प्रकारचे जळण ह्या चुलीत उत्तम पेटते. अचूक एकसारख्या मापाच्या चुली भराभर काढण्यासाठी लोखंडी साचा असल्यामुळे गावच्या कुंभारांना तसेच महिलांनाही घरबसल्या उद्योगधंदा सुरु करण्याची नवी संधी आहे. ही चूल जवळजवळ पारंपरिक वैलाच्या चुलीसारखीच दिसत असल्यामुळे महाराष्ट्रातील स्त्रियांच्या पसंतीस उतरते. चूल सुटसुटीत, सुबक आकाराची व कमी जागेत सुध्दा मावणारी आहे.

महिलांना सरपण गोळा करण्यासाठी वणवण करावी लागते. चुलींच्या धुरामुळे त्यांच्या आरोग्यावर घातक परिणाम होतो. शिवाय लाकूडफाटयासाठी होणा-या झाडतोडीमुळे पर्यावरणावर दुष्परिणाम होतात. याचा अभ्यास करुन निर्धुर चुलीचा स्वतःचा कारखाना उभारला. ३२०० ते ३५०० रुपयात घरोघरी जावुन चुल बसवुन देतो. शिवाय ही चुल अनंत काळ टिकते.
**शिवाजी कुंभार, कौलव ता. राधानगरी**

चुलीवर झटपट स्वयंपाक होउन वेळेची बचत होते. चूल चांगली पेटल्याने धूराचे प्रमाण कमी होते. धूरडयावाटे धूर बाहेर टाकला गेल्यामूळे धूराने डोळयांना होणारा त्रास कमी होतो, त्यामूळे आरोग्य चांगले राहते. चुलींना रंग दिल्यामुळे पारंपरिक चुलीप्रमाणे पांढर्‍या मातीने सारवण्याऐवजी काव किंवा सीमेंट कलरचा बोळा करून सारवता येते. त्यामुळे चूल नेहमी आकर्षक व सुंदर राहते.
**अपर्णा पाटील, गृहिणी, धामोड, ता.राधानगरी**

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )